# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Pali

## Assignment

### Session: 2018-2019

### Subject: Pali Compulsory

M T W T F S S
Page No.:
Date:
YOUVA

Yashoda Girl's Art's & Commerce College Nagpur.

Kunda S. Bagde.
Class : 2 Year
Sem : 4
Sub : Pali Literature (assigement

"Rashmi Mam".

Academic Session - 2018-2019

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce Colleg
Sneh Nagar, Nagpur-15

P Harnaware

SEAL
Yashoda Girls Arts & Commerce College

१★ रठ्ठपाल सुत्तांचा सारांश लिहा :=>

उत्तर :=> रठ्ठपाल सुत्त हा पाठ मज्झिमनिकाय या ग्रंथातील असून यामध्ये मनुष्यांच्या चार हानी विषयी राजा कौरव्य राष्ट्रपालाला सांगतो. राजा कौरव्य जेव्हा थेर राष्ट्रपालाला मृगाचिर येथील उद्यानभूमिला भेटण्यासाठी जातो तेव्हा थुल्ल-कोट्ठीत गावातील प्रधानाचा पुत्र असलेल्या थेर राष्ट्रपालाला पाहून राजाला फार आश्चर्य वाटते. तेव्हा कौरव्य राजा राष्ट्रपालाला म्हणतो की, मनुष्यांना होणाऱ्या चार प्रकारच्या हानीमुळे ते बेघर होवून प्रव्रजित होतात. तुम्ही कोणत्या कारणाने प्रव्रजित झाले आहात ?. पुढे राजा राष्ट्रपालाला मनुष्यांना होणाऱ्या हानी सविस्तरपणे सांगतांना म्हणतो की,

१) म्हातारपणामुळे मनुष्य कुठल्याही भोगांचा यथेच्छ लाभ घेवू शकत नाही, यामुळे तो बेघर होवून प्रव्रजित होतो.

२) जर एखादा मनुष्य दुर्धर रोगाने ग्रासित असेल तर तो प्रव्रजित होतो.

३) जर कोणी पुरूष आणि फार श्रीमंत असेल व नंतर काही कारणाने तो निर्धन झाल्यास निराश होवून प्रव्रजित होतो.

४) जर एखाद्या व्यक्तीचे नातेवाईक मित्र काही कारणामुळे त्याच्यापासुन दूर झाल्यास तो व्यक्ती प्रवज्जा ग्रहन करतो. अशाप्रकारे मनुष्याच्या जिवनात होणाऱ्या या चार हानीमुळे तो प्रव्रजित होतो.

यावर थेर राष्ट्रपाल राजा कौरव्याला धर्म साधनेची भगवंतानी दिलेल्या उपदेशाप्रमाणे चार कारणे सांगतो.

१) भगवंतानी सांगितल्याप्रमाणे हा संसार हळूहळू नष्ट होत आहे, तसेच तो विनाशी आहे,

२) या संसारामध्ये कोणीही सुरक्षित नाही, कारण येथे प्रत्येकाला संरक्षण नाही.

३) ह्या संसारामध्ये कोणीही आपले नाही, कारण प्रत्येकाला

Page No.: Date: YOUVA

4) हा संसार तृष्णेने युक्त आहे. मनुष्याने कितीही धन प्राप्त केले तरी ते त्याला कमीच वाटते.

भगवंतानी सांगितलेल्या या चार उद्देशामुळे थोर राष्ट्रपाल प्रव्रजित झाला. राष्ट्रपालाने सांगितलेले हे चार उद्देश राजाला सुद्धा योग्य वाटतात. राजा कौरव्य या चार उद्देशांना सविस्तरपणे समजून सांगतांना म्हणतो की, राजा किंवा सामान्य मनुष्य आपल्या तृष्णेला पूर्ण करण्यासाठी आपले आपले आयुष्य घालवितात व एक दिवस ते मृत्यूला प्राप्त होतात. मृत व्यक्तीचे नातेवाईक, मित्र, त्या व्यक्तिची कुठल्याही प्रकारे मदत करून त्यांचा मृत्यू थांबवू शकत नाही. मृत व्यक्ती स्वतः सोबत त्याची संपत्ती घेऊन जावू शकत नाही कुठलाही व्यक्ती धनाने दिर्घायू होत नाही. किंवा म्हातारपणाही थांबवू शकत नाही, मूर्ख व्यक्ती स्वतःच्या मूर्खतेमुळे तृष्णेच्या जाळ्यात फसतो. परंतू ज्ञानी व्यक्ती तृष्णेमुळे विचलित होत नाही, म्हणूनच प्रज्ञा ही धनापेक्षा श्रेष्ठ आहे. ज्याप्रमाणे एखादा चोर चोरी करतांना पकडल्या गेल्यास त्याला त्याची शिक्षा मिळते. त्याचप्रमाणे पापी मनुष्यांना त्यांच्या पापकर्मांची शिक्षा मिळत असते. ज्याप्रमाणे झाडाचे कच्चे व पिकलेले फळ केव्हा अवेळी पडतात त्याचप्रमाणे या संसारातील बालक व म्हातारे मृत्यूला प्राप्त करतात. म्हणूनच या जन्ममृत्यूच्या फेऱ्यात न पडता भिक्षूभाव! श्रामण्य भाव हाच श्रेष्ठ आहे हे जाणून राष्ट्रपाल प्रव्रजित होतो. अशाप्रकारे राष्ट्रपाल सुत्तात सहज व सोप्या उदाहरणाद्वारे जिवनाची वास्तविकता दर्शविली आहे.

SEAL

'उरग वग्गाचा' सारांश लिहा :=>

उत्तर :=> 'उरग वग्ग' हा भाग सुत्तनिपात या ग्रंथातील असून यात सापाच्या गुणवैशिष्ट्यांची तुलना भिक्षुंसोबत केलेली आहे.

एखादया व्यक्तिला साप चावला असता, त्याच्या शरिरात पसरणारे विष औषध देऊन नष्ट करतात तसेच भिक्षूंनी सुद्धा क्रोधाला नष्ट करावे, असे क्रोधरहित भिक्षुक साप जसा जीर्ण झालेली जुनी कातडी टाकून देतो, त्याचप्रमाणे तो या सांसरिक बंधनातून मुक्त होऊन संसाराला पार करतो. पाण्यामध्ये जाऊन ज्याप्रमाणे सहजतेने कमळ तोडावे. त्याप्रमाणेच भिक्षूंनी कामविकारांचा समूळ त्याग करावा भिक्षूंनी तृष्णा आणि अहंकाराला सुद्धा नष्ट करावे. उदुंबर वृक्षांवर ज्याप्रमाणे शोधूनही फुल दिसत नाही. त्याच-प्रमाणे भिक्षूंना पुर्नजन्मात काहीही तत्थ दिसत नाही. भिक्षूंनी मनात कुठल्याही प्रकारचा क्रोध ठेवू नये. भिक्षूंनी स्वतःच्या मनातील सर्व वाईट गोष्टींना समूळ नष्ट करावे.

जो भिक्षु पुढे धाव घेत नाही, अर्थात अतिविचार करित नाही, किंवा मागेही वळत नाही, अर्थात आळस करत नाही, तोच भिक्षू या प्रपंचाला (संसाराला) योग्यप्रकारे जाणून लोभ, आसक्ती, द्वेष आणि मोहरहित होऊन या सांसारिक बंधनाच्या पार जातो, तसेच ज्या भिक्षूच्या मनात पुर्नजन्माचा लोभ आणि अविद्या तोच भिक्षू साप ज्याप्रमाणे जीर्ण कातडी टाकून देतो. तसेच वाईट गोष्टींचा त्याग करून भिक्षू या सांसरिक बंधनाचा त्याग करतो.

अशाप्रकारे 'उरगवग्गात' भिक्षूंविषयी महत्वपूर्ण माहिती दिलेली आहे.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15
SEAL